# कार्यावली

## सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

एक : राज्यपालांचे अभिभाषण.

दोन : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

तीन : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

चार : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

पाच : प्रश्नोत्तरे

सहा : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

सात : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

आठ : सन २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर करणे व त्यावर सर्वसाधारण चर्चा करणे.

नऊ : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

दहा : अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

अकरा : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

बारा : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

तेरा : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

चौदा : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

पंधरा : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

सोळा : शासकीय विधेयके

सतरा : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**अठरा** : शोक प्रस्ताव

**एकोणीस** : इतर प्रस्ताव

**वीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**एकवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये

**बावीस** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे**

(२) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्रातील भावी पिढीच्या शाश्वत भवितव्याची तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचे**

(३) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक, २०२५ - **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांचे**

**तेवीस** : **अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -**

**श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ४ व ८७**

(१) "सातारा - लातूर महामार्गाला राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले महामार्ग असे नाव देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) "मौजे कटगुण (ता.खटाव, जि. सातारा) या गावाला पर्यटनाचा "ब" दर्जा देऊन याठिकाणी असलेले राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले स्मारकाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) "केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरीता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती

व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८७) "राज्यात पिण्याच्या पाण्याची बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०**

(६) "महाराष्ट्रात अनेक नद्यांचा उगम होत असून या नद्यांच्याव्दारे पाण्याचा स्त्रोत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने अनेक गावे सिंचनाखाली येत असून त्या परिसरातील गावे सुजलाम-सुफलाम होणे, अनेक शहरात देखील पुरेसा पाणीपुरवठा होत असल्याने उद्योगधंद्यात देखील वाढ होत असणे, सद्य:स्थितीत अनेक ठिकाणी सिमेंटचे रस्ते बांधकाम होत असणे, अनेक नदी पात्राजवळ अवैध अतिक्रमणांमुळे या नद्यांचे पात्र कमी होत असणे, या नद्यांमध्ये गावातील तसेच शहरातील घाण व दुषित पाणी सोडण्यात येणे तसेच सिमेंटीकरणामुळे अनेक नद्यांची उगमस्थाने नष्ट होत असणे, अनेक ठिकाणी पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत बंद करुन तेथे अवैध बांधकामे करण्यात येणे, नद्यांच्या नैसर्गिक स्त्रोतांचे जतन करून नद्यांच्या संवर्धनाकरिता पाण्याचे सनियंत्रण, तसेच अवैध अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने निश्चित धोरण तयार करुन त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७) "मुला-मुलींना लहानाचे मोठे केल्यानंतर या मुलांकडून आपल्या आई-वडीलांची सतत अवहेलना अपमान करण्यात येत असणे, म्हातारपणी मुलगा/मुलगी आपला आधार आहे, अशी भोळी भाबडी आशा बाळगून आई-वडील आपल्या मुला-मुलींना कोणतीही गोष्ट कमी पडून देत नसणे, म्हातारपणी मुले आई-वडीलांची सेवा सुश्रुषा न करता त्यांना वृध्दाश्रमात अथवा इतरत्र सोडून देत असणे अथवा अपमानीत करून घराच्या बाहेर काढत असणे, आयुष्याच्या शेवटी मुला-सूनांकडून त्यांना योग्यप्रकारे वागणूक मिळत नसणे, म्हातारपणी मुलांनी आपल्या आई-वडीलांचा योग्यरित्या सांभाळ करावा त्यांची सेवा सुश्रूषा करावी याकरिता शासनाने निश्चित धोरण ठरवावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास कांम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण,

त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. जगन्नाथ अभ्यंकर वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११**

(११) "रात्रशाळेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या विशेष सेवांचा विचार करून राज्य शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रात्रशाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा काही अटींचे अधीन राहून पूर्ण वेळ करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाचा लाभ बहुतांशी मुख्याध्यापकांनी आणि काही शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला. त्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्यात आल्या आणि त्यांना नियमित वेतनश्रेणी देय ठरवण्यात आली. दरम्यान दिनांक ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयामुळे श्रमकरी तरुणांच्या शिक्षणाची व्यवस्था रात्रीच्या शाळांमध्ये करणाऱ्या काही मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ होण्याच्या लाभापासून वंचित ठेवले गेले. रात्रशाळेतील कर्मचाऱ्यांच्या असाधारण सेवांचा विचार करून शासन निर्णय दिनांक १७ मे २०१७ प्रमाणे या कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्णवेळ करण्याची कार्यवाही पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. वसंत खंडेलवाल वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८ व १९**

(१६) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१७) "राज्यातील 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका यांना उत्पन्नाचे स्त्रोत कमी असणे, गृह कर व इतर अतिरिक्त कर वाढविण्याला मर्यादा असणे, त्यामुळे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात विकासाला खीळ बसणे, खेडे गावातील लोकसंख्या कमी होऊन शहरी लोकसंख्या सातत्याने वाढत असणे, ग्रामीण भागासाठी अनेक योजनांमधून पायाभूत विकासाकरिता निधी उपलब्ध होत असतो, त्याचप्रमाणे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत विकासाकरिता शासनाने विशेष अनुदान द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१८) "राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका यांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) "राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता अकोला जिल्ह्यातील असदगड, बाळापूर किल्ला, नरनाळा किल्ला, गाविलगड सह राज्यातील पडझड झालेल्या किल्ल्यांची दुरुस्ती व डागडुजी करून किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाय योजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. संजय केणेकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २१ व २३**

(२१) "राज्यातील सर्वच महानगरपालिकामधील लोकसंख्येत होत असलेली वाढ, नव्याने होत असलेल्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, कचऱ्यावर योग्य प्रक्रिया होत नसल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेला विपरित परिणाम, निर्माण होत असलेले प्रदुषणास आळा घालण्याकरिता राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया व कचरा व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२३) "सद्याःच्या डिजिटल युगात प्रत्येकाकडे मोबाईल हे एक अत्यावश्यक उपकरण झाले आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे मोबाईलची स्क्रीन मेंदूना घातक ठरणे, झोपेचा अभाव, मानसिक तणावामुळे कमी स्ट्रोक, एपिलेप्सी, मायग्रेन, झटके या सारखे गंभीर मेंदूविकारामध्ये वाढ होत असतानाही याचा वापर तरुण वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात होत असणे, मोबाईलचा वापर चांगल्या कामाकरीता न होता सोशल मिडीया, ऑनलाईन गेम, आवश्यक नसणाऱ्या साईटस बघण्यात वेळ वाया घालवित असणे, मुलांचे भविष्याचे संरक्षण व्हावे, त्यांचे हक्क आणि अधिकाराचेही जतन होणे आवश्यक असणे, ऑस्ट्रेलियाने ऑनलाईन सुरक्षा सुधारणा कायदा २०२४ लागू करून १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली असणे, त्याचप्रमाणे आपल्या राज्यात देखिल १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याबाबत कायदा करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २५, २६, २७, २८ व २९**

(२५) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, तसेच राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२६) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी

नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२७) "राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील दूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषणाच्या समस्येवर उपाय शोधून शासनाने प्रभावीरीत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२८) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२९) "राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३०, ३१, ३२, ३३ व ३४**

(३०) "राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व

शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३१) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३२) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३३) "राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३४) "राज्यात मोठ्या प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, दैनंदिन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी तसेच वेळ व इंधनाची बचत आणि विकासाच्या दृष्टीने राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. संजय खोडके वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३५ व ३९**

(३५) "राज्यातील 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका यांना उत्पन्नाचे स्त्रोत कमी असणे, गृह कर व इतर अतिरिक्त कर वाढविण्याला मर्यादा असणे, त्यामुळे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात विकासाला खीळ बसणे, खेडे गावातील लोकसंख्या कमी होऊन शहरी लोकसंख्या सातत्याने वाढत असणे, ग्रामीण भागासाठी अनेक योजनांमधून पायाभूत विकासाकरिता निधी उपलब्ध होत असतो, त्याचप्रमाणे 'क' व 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत विकासाकरिता शासनाने विशेष अनुदान द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३९) "महाराष्ट्रामध्ये लागवडीखालील शेतीपैकी ८० % शेती ही कोरडवाहू लागवडीखाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या ज्या काही योजना या १५ ते २० वर्षात आल्या. त्या ओलीत लागवडीखालील शेतीकरिता आलेल्या आहेत. त्यामुळे ८० % शेतकरी हे शासकीय योजनेपासून किंवा सरकारच्या मदतीपासून वंचित राहत आहेत, त्यामुळे कोरडवाहू लागवडीखालील शेती करिता जास्तीत जास्त योजना आखून त्याचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. राजेश राठोड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४०, ४१, ४२, ४३ व ४४**

(४०) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४१) "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४२) "बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली आहे तसेच केंद्रशासनाच्या भाषेच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याबाबत राज्यशासनाने यापूर्वी शिफारस केली आहे, परंतू याबाबत केंद्र शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नसल्याने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देऊन केंद्र शासनाच्या भाषेच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४३) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युतपंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४४) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४६, ४७ व ४८**

(४६) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४७) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४८) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४९, ५०, ५१, ५२ व ५३**

(४९) "मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५०) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५१) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५२) "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५३) "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनींपैकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे

देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुधाकर अडबाले वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५४, ५५, ५६ व ५७**

(५४) "राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांचे आर्थिक लेखापरिक्षण तपासण्यासाठी राज्य विधानमंडळाची पंचायत राज समिती अस्तित्वात आहे. त्याच धर्तीवर महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत यांचे लेखा परिक्षण तपासण्यासाठी विधीमंडळाची समिती गठीत करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५६) "विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५७) "राज्यात महापूर, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटाना तोंड देण्यासाठी व बाधित नागरीकांना त्वरेने पुरेसे अर्थसहाय्य करण्यासाठी तसेच अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी गोळा करणे व आपदग्रस्तांचे पुनर्वसन विनाविलंब

होण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. धीरज लिंगाडे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५८, ५९, ६०, ६१ व ६२**

(५८) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५९) "विदर्भातील अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा इत्यादी जिल्ह्यांचा समावेश आहे. अमरावती येथे या पाचही जिल्ह्यांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विद्यापीठ असून या विद्यापीठात वाशिम, अकोला व बुलढाणा या भागातील लाखों विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता अमरावती येथे दिडशे किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन प्रवास करुन विद्यार्जनासाठी जावे लागते, परिणामी त्यांचे श्रम, वेळ व पैसा खर्ची जात असतो, या भागातील लाखों विद्यार्थ्यांची अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरीता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी असणे, या भागात शैक्षणिक बाबींचे जलदगतीने संनियंत्रण व नियोजन होण्याच्या दृष्टीने बुलढाणा येथे उपरोक्त तीन जिल्ह्यांकरिता "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याची तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६०) " राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य

महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६१) " राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुर:सर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने / मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. जातपडताळणी समित्या त्यांचे निर्णय काही विवक्षित कारणामुळे मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६२) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६३, ६४, ६५, ६६ व ६७**

(६३) "पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यासह किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे पाणी खारेपाणी शेत जमिनीत शिरून मालमत्तचे झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या

अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कार्याबद्दल कार्यक्रम आखून त्यांची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६४) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६५) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६६) "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण अधिकतम वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(शा.म.मु.) एचबी २९४१---३ (३००---०२-२०२६)

(६७) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. परिणय फुके वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६८, ६९, ७०, ७१ व ७२**

(६८) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६९) "राज्यात विशेषत: विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषाअभावी भूसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भात प्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७०) "देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देवून त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७१) "राज्यात विशेषत: विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयांतील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे दुर्बल घटकातील रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच तज्ज्ञ डॉक्टरांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयांना आग लागण्याचे प्रकार मागील काही वर्षांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन रुग्णांना योग्य सोय व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयाची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७२) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सत्यजीत तांबे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७३, ७४, ७५, ७६ व ७७**

(७३) "राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली असमाधानकारक कामगिरी लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७४) "राज्यात मुख्यत: शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थांचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरू करून अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी कडक कारवाई व उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७५) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७६) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७७) "राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये मराठी पुस्तक विक्री केंद्रांची संख्या ३५ पेक्षाही कमी झाल्याचे निदर्शनास आले असून, परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांवरील दुकानांवर मोठ्या प्रमाणात भाडे आकारत असल्याने ही दुकाने बंद पडत आहेत; तरी मराठी भाषा व वाचनसंस्कृतीच्या जतनासाठी शासनाने बस स्थानकांवरील पुस्तक गाळ्यांचे भाडे नियंत्रित करून त्यांना विशेष सवलत द्यावी आणि मराठी पुस्तक विक्री दुकानांच्या पुनरुज्जीवनासाठी तातडीने स्वतंत्र प्रोत्साहनपर धोरण लागू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७८**

(७८) "अधिवास (डोमासाईल) प्रमाणपत्र हे राज्याचे रहिवासी असल्याचे सिद्ध करणारा एक महत्त्वाचा आणि आवश्यक दस्तऐवज असून राज्यातील शिक्षण, शासकीय नोकऱ्या व विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी वापरण्यात येतो. सदर प्रमाणपत्र मिळणेसाठी किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्यास दिले जात असणे, सन २०१० नंतर राज्यात स्थलांतरित झालेल्या नागरीकांना डोमासाईल मिळणार असून राज्यातील विविध योजनांचा लाभ घेण्यास अनेक परप्रांतीय पात्र ठरत असणे, परिणामी राज्यातील मूलनिवासी नागरिकांवर याचा मोठा परिणाम होत असणे, यावर आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८०, ८१ व ८२**

(८०) "राज्यातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध होत नाही, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या मिळत नसल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८१) "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण अधिकतम वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८२) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगारा अभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींनी रोजगार मिळण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८३, ८४ व ८५**

(८३) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८४) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८५) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**चोवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा.

**पंचवीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे
(यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२६.**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव - ३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई